**Details on Website**

# नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी व निम्नश्रेणी-लघुलेखक यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत...

**विभागाची आवश्यकता :**

नगर विकास विभागातील कामकाज तसेच विधीमंडळ कामकाजाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी (२ पदे) व सेवानिवृत्त निम्नश्रेणी-लघुलेखक (१ पद) यांची नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीकरीता नियुक्ती करावयाची आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती केवळ एक वर्षाच्या कालावधीकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर,२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणारआहे.

२) राज्य शासनाच्या मंत्रालयीन सेवेतून सेवानिवृत्त झालेले सहायक कक्ष अधिकारी व निम्नश्रेणी-लघुलेखक असावेत.

३) नगर विकास विभागातील कामकाजाचा अनुभव असावा.

४) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

५) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

७) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांनी सदर पदाकरिता अर्ज सादर करावा.

८) उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज दि.२१.०३.२०२४ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत "उप सचिव (आस्थापना), दालन क्र.१, मुख्य इमारत (सचिवांची दालने), ४ था मजला, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२" या पत्त्यावर पोहोचेल अशा रितीने पोस्टाने पाठवावा अथवा व्यक्तीशः आणून द्यावा.

या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२८५४५७३/०२२-२२८२०४५५ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

९) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

१०) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

११) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कर्मचा-यांस नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

१२) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक ८ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

**************